# दिव्यांगांचा अर्थ आणि २०१६ च्या कायद्याप्रमाणे दिव्यांगांचे प्रकार

**प्रा. डॉ. दत्तात्रय कुंडलिक पाटील**
सहाय्यक प्राध्यापक,
कर्मवीर हिरे कला, शास्त्र, वाणिज्य आणि
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी.
dattatrayapatil78@gmail.com

**सारांश** :-

*कोणत्याही राष्ट्रातील व समाजातील दिव्यांग व्यक्ती सक्षम असणे म्हणजे तो समाज किंवा ते राष्ट्र विकासामध्ये पुढे जाते. आणि तेथेच खऱ्या अर्थाने लोकशाही नांदत असते. त्या दृष्टीने महाराष्ट्र नेहमीच भाग्यवान राहिला आहे. महाराष्ट्रामध्ये अनेक समाज सुधारकांनी दिव्यांगासाठी त्या तत्कालीन परिस्थितीत अनेक प्रकारची सामाजिक कार्य उभा केली आहेत. त्यामुळे आजही महाराष्ट्रात दिव्यांगांचे प्रश्न आ वासून उभे आहेत. भारतामध्ये दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६साली हा कायदा झाला. या देशात सर्वसामान्य व्यक्ती केंद्रस्थानी आहे. दिव्यांग व्यक्ती शारीरिक, मानसिक, बौद्धिक कमतरतेवर मात करून त्यांचे मनोबल व मनोदय वाढवणे व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेणे या हेतूने भारत सरकारने दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ हा कायदा बनवला. हा कायदा सात वर्षाच्या प्रदीर्घ प्रक्रियेचा परिपाठ आहे. विकलांगांच्या चळवळीची वाढती परिपक्वता, चिकाटी व बदल आणण्यासाठी क्षमता याचे उत्तम उदाहरण म्हणजे हा कायदा आहे. या कायद्याची कल्पना जून २००९ मध्ये दिल्लीमधील एका लहानशा खोलीत जन्माला आली व त्यानंतर दोन वर्षांनी भारताने विकलांगांच्या हक्कासाठी बोलवण्यात येणाऱ्या सभेला मंजुरी देऊन शंभरच्या वर सुधारणा, छाननी केल्यावर एन.सी.आर.पी.डी. ला असे वाटले की आपण दिव्यांगासाठी एक कायदा बनवावा आणि त्यामुळे दिव्यांगांना त्यांचे हक्क व अधिकार मिळतील म्हणून हा कायदा पारित झाला. दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम हा कायदा म्हणून या कायद्याअंतर्गत अपंगांचे जे जे प्रकार आहेत ते सर्व प्रकार 21 प्रकारांमध्ये विभागून सर्व अपंगांना दिव्यांग म्हणून घोषित करण्यात आले व समाजात त्यांच्या व्यंगावरून न बोलवता त्यांना दिव्यांग ही आपण उपाधी लावली आहे अशा दिव्यांगांचे आपण प्रकार पाहणार आहोत त्यामुळेच या शोधनिबंधासाठी "दिव्यांग म्हणजे काय? व दिव्यांगांचे प्रकार" हा विषय निवडला आहे.*

***बीजसंज्ञा***:- *दिव्यांग, त्यांचे प्रकार , २०१६ चा दिव्यांग व्यक्ती अधिकार, अधिनियम*

## प्रस्तावना

**दिव्यांग म्हणजे काय?**

दिव्यांग किंवा अपंगत्व अशी स्थिती आहे जी एखाद्या व्यक्तीच्या काही क्रिया व आंतरक्रिया करणे किंवा त्याच्या सभोवतालच्या सामाजिक व भौतिक दृष्ट्या असणाऱ्या वातावरणाशी प्रभावीपणे संप्रेषण करणे कठीण करते. यामध्ये अनेक प्रकारची परिस्थिती व दोष आढळतात दिव्यांगांमध्ये बौद्धिक, मानसिक, विकासात्मक, संज्ञानात्मक, संवेदनात्मक व शारीरिक अशा घटकांमध्ये संयोजन असते. या अपंगांमध्ये काही व्यक्तींना जन्मापासून दोष असतात तर काहीना जीवनकाळात दोष येऊ शकतात. अशा अपंग माणसांना समाजात अनावश्यकपणे वेगळी वागणूक दिली जाते आणि समाजातील कार्यक्रमापासून सुद्धा वेगळे ठेवले जाते

**अपंग व्यक्तीच्या हक्कावरील संयुक्त राष्ट्राच्या अधिवेशनात अपंगत्वाची व्याख्या** खालील प्रमाणे केली आहे.

"अपंगत्व म्हणजे ज्या व्यक्तींच्या दीर्घकालीन शारीरिक, मानसिक,बौद्धिक किंवा संवेदनात्मक कमजोरीमुळे विविध अडथळ्यासह परस्पर संवादात (व्यक्तिच्या ) इतरांबरोबर बरोबर समान आधारावर पूर्ण आणि प्रभावी सहभागास अडथळा आणतात अशाला अपंगत्व म्हणतात." Long term physical mental intellectual are sensory impairments which in interaction with various barriers may hinder (a person's) full and effective

participation in society on an equal basis with others."

अपंगत्वावरील जागतिक अहवालानुसार जगातील १५ % लोकसंख्या किंवा एक लाख लोक अपंगत्वाने ग्रस्त आहेत. त्यामुळे अपंगत्व ही विवादित संकल्पना आहे. ज्याचा वेगवेगळ्या समुदायात वेगवेगळा अर्थ बदलतो. अपंगत्व हे सहज दिसते किंवा निसर्गामध्ये अदृश्य सुद्धा असू शकते. फिजिऑलॉजिकल फंक्शनल कॅपॅसिटी (PFC) हे एखाद्या व्यक्तीच्या कार्यक्षमतेच्या पातळीचे मोजमाप करते. दैनंदिन जीवनातील भौतिक कार्य आणि ही कार्ये सहजतेने पार पाडण्यासाठी वयानुसार पी. एफ. सी. कमी होत जाते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला कमकुवतपणा, शारीरिक विकार आणि संवेदनात्मक विकार असे होऊ शकतात अशा लोकांना अपंग म्हणून लेबल दिले जाते.

भारत सरकारने दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ ( The Rights of Person with Disabilities Act, 2016 ) हा कायदा दिव्यांग (अपंग) व्यक्तीसाठी पारित केला. RPWD Act -२०१६ हा कायदा म्हणजे Parsons with Disabilities Act, 1995 यापूर्वीच्या कायद्यात महत्त्वाचे व आवश्यक बदल व सुधारणा करून यापुढे दिव्यांग व्यक्तीसाठी हा सुधारित कायदा अपंगांचे हक्क व संरक्षण करणारा कायदा म्हणून RPWD Act २०१६ पारित झाला.

दिव्यांग किंवा अपंग हा शब्द ऐकला की आपल्यासमोर पायाने, हाताने अधु असलेली व्यक्ती दिसते पण पायाने किंवा हाताने अधू असलेलीच व्यक्ती अपंग किंवा दिव्यांग नसते तर तो एक अस्थिव्यंगाचा प्रकार झाला. मग याप्रमाणे शारीरिक, मानसिक व बौद्धिक दृष्ट्या दिव्यांगत्वाचे २१ प्रकार पाडलेले आहेत.

या कायद्याप्रमाणे दिव्यांग म्हणजे काय हे समजून घेण्यासाठी दिव्यांग, अपंग, विकलांग असे शब्द ऐकल्यानंतर आपल्या डोळ्यांसमोर हातापायांनी अपंग, लुळा, पांगळा, आंधळा, चालता न येणारे असे चित्र आपल्या समोर दिसते परंतु आता यापुढे अपंग लुळा अशी ओळख न ठेवता यासाठी दिव्यांग हा शब्द आला आहे.

अपंग किंवा दिव्यांग व्यक्तीमध्ये दोष किंवा अक्षमता हे शब्द आपण नेहमी वापरतो. अशामध्ये दोष किंवा अक्षमता आहे अशी समाजाची समजूत असते मात्र सर्वसामान्य माणसातही दोष असतो. दोष आपल्या शरीराच्या कार्याबद्दल थोडाफार बिघाड व्यक्त करतो तर अक्षमता म्हणजे व्यक्तीचे कोणतेही कार्य करण्याबाबत असमर्थता व्यक्त करतो.

**अभ्यासाची उदिष्ट्ये : -**

दिव्यांग आणि दिव्यांगाचे प्रकार या विषयाच्या अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंधात खालील उद्दिष्टांना अनुसरून अभ्यास करण्यात आलेला आहे

१) दिव्यांग म्हणजे काय याचा अभ्यास करणे.

२) दिव्यांगाचे प्रकार स्पष्ट करणे

३) २०१६ च्या कायद्याप्रमाणे दिव्यांग प्रकार अभ्यासणे .

**संशोधन पद्धती व माहिती स्त्रोत:-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा वापर केला आहे यात शासकीय अहवाल, शासनाची मासिके , परिपत्रके , शासकीय योजना , पुस्तके यांचा वापर केला आहे.

दिव्यांग म्हणजे काय? हे समजून घेण्यासाठी प्रथम १) दोष किंवा विकार (Impairment ) २) अक्षमता (Disability) ३) अपंगत्व( Handicap) या प्रक्रिया समजून घेणे महत्त्वाचे आहे.

**१) बिघाड/ दोष/ विकार (Impairment)**

बिघाड किंवा दोष किंवा विकार म्हणजे शरीरांच्या अवयवांचे आणि शरीराच्या रचनेच्या कार्य करण्यास बाधित असणे किंवा सर्वसामान्यपणे न होणे म्हणजे दोष होय. ज्यामध्ये जखम, आजार आणि शारीरिक कार्य करत असताना येणारा अडथळा म्हणजे विकार होय.

**२) अक्षमता (Disability)**

ज्यावेळी एखादी व्यक्ती जन्मता असलेल्या किंवा जन्मानंतर निर्माण झालेल्या क्षतीमुळे स्वतःचे काम इतराप्रमाणे करू शकत नाही तेव्हा त्या स्थितीला त्या व्यक्तीची अक्षमता असे म्हणतात. व्यक्तीला आलेल्या क्षतिग्रस्ततेमुळे काम करण्याच्या क्षमतेवर मर्यादा येतात व त्यातूनच अक्षमता निर्माण होते ही अक्षमता व्यक्तीला जन्मतः किंवा जन्म झाल्यानंतर केव्हाही निर्माण होऊ शकते व ही अक्षमता कायमस्वरूपी किंवा तात्पुरती असू शकते. यामध्ये एकाच प्रकारच्या अक्षमतेमध्ये दोन व्यक्तींच्या गरजा ह्या वेगवेगळ्या देखील असू शकतात. उदा. अंध, कर्णबधिर, बौद्धिक अक्षमता.

**३) अपंगत्व ( Handicap)**

ज्यावेळी एखाद्या व्यक्तीमध्ये त्याची अक्षमता तीव्र स्वरूपाची असते की त्या व्यक्तीला तिच्या सर्व कामासाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते तेव्हा अशा व्यक्तीच्या स्थितीला अपंगत्व किंवा हॅंडीकॅप असे म्हणतात.

**दिव्यांग म्हणजे काय**

दिव्यांग किंवा अपंगत्व असणारी व्यक्ती म्हणजे दीर्घकालीन ज्या व्यक्तीमध्ये शारीरिक, भौतिक, मानसिक, पेशी व रक्ता संबंधी दोष किंवा अक्षमता असते. ज्यांचे प्रमाणीकरण केल्यावर ४०% पेक्षा जास्त दिव्यांगाचे किंवा अपंगत्वाचे प्रमाण आढळते अशा व्यक्तींना दिव्यांग किंवा अपंग म्हणून ओळखले जाते.

**दिव्यांग किंवा अपंगत्वाचे प्रकार:**

दिव्यांग किंवा अपंगत्वाचे प्रमुख चार विभाग आहेत व त्यामध्ये २१ प्रकारचे दिव्यांग प्रकार दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ प्रमाणे पाडलेले आहेत.

१) शारीरिक दिव्यांगत्व ( Physical disability)

२) बौद्धिक दिव्यांगत्व ( Intellectual disability )

३) मानसिक दिव्यांगत्व ( Mental behavior )

४) पेशी व रक्तासंबंधी दिव्यांगत्व (Chronic neurological and blood disorder)

**दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ प्रमाणे दिव्यांगांचे प्रकार खालीलप्रमाणे आहेत.**

**१) शारीरिक अपंगत्व**

शारीरिक दिव्यांगत्व किंवा अपंगत्व म्हणजे शरीराचा कोणताही भाग किंवा एखादा अवयव निकामी होणे, स्नायूंची विकृती घडणे, शरीराची वाढ खुंटणे अशा प्रकारच्या समस्या या प्रकारामध्ये येतात त्यास शारीरिक दिव्यांगत्व असे म्हणतात यामध्ये नऊ प्रकार मोडतात ते प्रकार खालील प्रमाणे आहेत.

**१) अस्थिव्यंग**

ज्या व्यक्तीला मज्जा संस्थेचा त्रास ,स्नायू किंवा दोन्ही मुळे होणाऱ्या परिणामामुळे व्यक्तीला शारीरिक हालचाली सामान्य व्यक्ती सारख्या करता येत नाही अशा व्यक्तींची हाडे, सांधे,व वायू हे योग्य प्रकारे कार्य करू शकत नाहीत अशा हालचाल संबंधित क्रिया करण्यास अक्षम असणारी व्यक्ती म्हणजे अस्थिव्यंग होय. यामध्ये पोलिओचा आजार, पायात व्यंग असलेले व्यक्ती मोडतात हे अपंगत्व सहज दिसणारे असते. यामध्ये व्यक्ती हालचाल यासारख्या क्रिया करण्यास अक्षम असते.

**2) कुष्ठरोग**

या प्रकारातील व्यक्ती 'कुष्ठरोग बरा झाली आहे' अशी असते. परंतु यामध्ये व्यक्तीच्या हातापायातील संवेदना कमी होतात आणि पेरेसी मुळे पापण्या आणि डोळे यातील संवेदना कमी होतात. पण ते स्पष्टपणे व्यंग नाही अशा व्यक्तीच्या त्वचेच्या रंगात फरक असणे, यामध्ये विशिष्ट प्रकारचे चट्टे त्वचेवर तयार होतात अशा व्यक्तींच्या त्वचेवर खवले व डाग सुद्धा असतात.

यामधील व्यक्ती स्पष्ट विकृत आणि पॅरॉलिसिस होतात परंतु त्यांच्या हातात व पायामध्ये पुरेशी हालचाल असल्यामुळे ते सामान्य आर्थिक घडामोडीमध्ये सहभागी होऊ शकतात. अशा व्यक्तीमध्ये कुष्ठरोगामुळे परिणाम झालेल्या भागांची संवेदना नाहीशी होते या व्यक्तीमध्ये व्यक्तीची हात, पाय, बोटे सुन्न पडतात. अत्यंतिक शारीरिक विकृतीत वाढलेले वय ज्यामुळे अशा व्यक्तीला कोणताही लाभदायक व्यवसाय करण्यास प्रतिबंध होतो आणि अशा व्यक्तीला 'कुष्ठरोग बरा झालेला' असे अभिदान त्यानुसार वापरले जाते.

**३) मेंदूचा पक्षाघात**

सेरेब्रल पाल्सी किंवा मेंदूचा पक्षघात म्हणजे मेंदूवर झालेला आघात असतो किंवा व्यक्तीच्या अपघाती घटनेमुळे मेंदूच्या विकास प्रक्रियेवर परिणाम होऊन शरीराच्या एका किंवा अनेक भागांचे नियंत्रण कमी झाल्याने अनेक प्रकारची विविधांगी, विकलांग व अपंग व्यक्ती होय. यामध्ये व्यक्तीचे हालचालीवर नियंत्रण नसते, मेंदूचा शरीरावर ताबा राहत नाही अशा व्यक्तींच्या अवयवामध्ये ताठरता येते. खास करून हाताच्या व पायांच्या स्नायूमध्ये ताटरता येते, वाचा समस्या निर्माण होते, मेंदूला इजा झाल्याने अशा व्यक्तीला हालचालीवर नियंत्रण ठेवण्यात अडचणी निर्माण होतात. अशा व्यक्तीची हालचाल क्षमता कमी असते याला मेंदूचा पक्षघात असे म्हणतात.

**४) बुटकेपणा**

एकंदरीत सामान्य मुलापेक्षा खूप कमी उंची असलेल्या मुलांना बुटकेपणा असे म्हणतात. बुटकेपणा

म्हणजे अनुवंशिक किंवा वैद्यकीय स्थिती ज्यामुळे अशा प्रौढ व्यक्तींची उंची ४ फूट १० इंच म्हणजे (१४७ सेंटीमीटर) किंवा त्यापेक्षा कमी असते अशा व्यक्ती या बुटकेपणा या दिव्यांग प्रकारात मोडते. अशा व्यक्तींच्या उंचीत वाढ होत नाही आणि उंची फार कमी असते शारीरिक गुणसूत्रामुळे शरीराची वाढ व विकास इतर मुलापेक्षा कमी असतो.

**५) अविकसित मांसपेशी किंवा स्नायूंची विकृती**

अविकसित मांसपेशी हा स्नायुंशी निगडित असणारा आजार आहे. या आजारामुळे ग्रस्त असणाऱ्या व्यक्तींच्या शरीरातील ठराविक अवयवातील स्नायूंचे तंतू कमजोर होऊ लागतात. गटागटाने अशा मांसपेशी कमकुवत होतात मुलींपेक्षा मुलांमध्ये हा आजाराचे प्रमाण जास्त आहे यामध्ये व्यक्तीला उभे होताना हात व गुडघ्याचा आधार घेऊनच उभे राहता येते. कधीकधी स्नायूंचे तंतू नष्ट होतात.

**६) ॲसिड हल्लाग्रस्त पीडित**

ॲसिड (आम्ल) पिडित म्हणजे ॲसिड अंगावर व मुख्यतः चेहऱ्यावर फेकून केला जाणारा एक हिंसक व प्राणघातक हल्ला असतो. ॲसिड हा द्रव पदार्थ ज्वालाग्रही असून एखाद्या व्यक्तीच्या शरीरावर पडल्याने शरीर जळते आणि यामुळे व्यक्तीला अपंगत्व, विद्रूपणा किंवा मृत्यू सुद्धा येऊ शकतो. सहसा हे चेहऱ्यावर द्रव टाकले जाते यामुळे त्वचेच्या उत्तींचे नुकसान होते याचबरोबर व्यक्तीच्या हाडावरही आघात होऊन ते ठिसूळ होतात ह्या हल्ल्याचा दीर्घकालीन परिणाम होऊन व्यक्तीला अंधत्व, शरीराचा व त्वचेचा भाग कायमचा खराब होऊ शकतो.

**७) अंध**

ज्या व्यक्तीला दोन्हीही डोळ्यांनी काहीच दिसत नाही. वैद्यकीय दृष्ट्या या व्यक्तीमध्ये दृष्टीचा पूर्णपणे अभाव असतो किंवा चांगल्या डोळ्यांची दृष्टीतीक्ष्णता १०/२०० किंवा ३ ते ६० स्नेलन पेक्षा कमी आहे तसेच दृष्टी क्षेत्र मर्यादा १० डिग्री अंशापेक्षा कमी दृष्टिकोनाचे क्षेत्र असते अशा व्यक्तीला पूर्णता अंध असे म्हणतात. अशा व्यक्तीचे डोळे हे जन्मतः बंद असणे, उजेड किंवा अंधार न समजणे, हालचाल करताना या व्यक्तीला अडचणी येतात कधी कधी अपघाती अंधत्व येते.

**८) अंशतः अंध किंवा अल्पदृष्टी**

ज्या व्यक्तीचा एक डोळा निकामी झालेला असतो किंवा दोन्ही डोळ्यांची दृष्टी कमी असते आणि अशा व्यक्तीला जवळचे व लांबचे दिसत नाही अशा प्रकारातील दृष्टीदोष म्हणजे अंशतः अंध होय अशा व्यक्तीला पुस्तकावरील पाहताना व वाचताना अडचणी येतात उपचार करूनही डोळ्यांना बरोबर दिसत नाही.
वैद्यकीय दृष्ट्या चांगल्या डोळ्यांची दृष्टीतीक्ष्णता ६/१८ किंवा २०/६० पेक्षा कमी आणि ३/६० किंवा १०/२०० स्नेलन यापेक्षा कमी दृष्टीतीक्ष्णता असणारी व्यक्ती या प्रकारात मोडते. तसेच दृष्टीक्षेत्र मर्यादा १० ते ४० डिग्री अंश पर्यंत दृष्टीकोनाच्या क्षेत्रामध्ये या व्यक्ती येतात अशा व्यक्तीवर उपचार करूनही डोळ्यांना बरोबर दिसत नाही.

**९) कर्णबधीर**

सर्वसाधारणपणे कर्णबधीर म्हणजे ज्या व्यक्तीला कानाने ऐकायला येत नाही किंवा ऐकण्याची क्षमता कमी असते अशा व्यक्तीला 'कर्णबधीर व्यक्ती' असे म्हणतात. ज्या व्यक्तीच्या कानाचा श्रवणऱ्हास हा ६० डी.बी. किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर अशा व्यक्तीला कर्णबधिर व्यक्ती असे म्हणतात. किंवा जेव्हा ज्या व्यक्तीच्या दोन्हीही कानांचा श्रवणऱ्हास हा ७०डी.बी. किंवा त्यापेक्षाही जास्त झालेला असतो अशा व्यक्तीला समाजात कर्णबधिर व्यक्ती म्हणून संबोधले जाते. अशा व्यक्तीला ऐकायला न आल्यामुळे भाषा विकास होत नाही त्यामुळे या व्यक्तीला बोलता येत नाही काही व्यक्तींना ऐकायला सुद्धा येत नाही मात्र अशा व्यक्ती बोलतात खास करून वयस्क व्यक्तींना बोलता येते मात्र अशा व्यक्तींची श्रवण शक्ती नष्ट होते कधी कधी कमी झालेली असते काही व्यक्तींना अपघातामुळे सुद्धा कर्णबधीरत्व होते ऐकू न आल्यामुळे अशा व्यक्तींना बोलताना अडचणी जाणवतात.

**१०) वाचा आणि भाषा अक्षमता**

ज्यावेळी व्यक्तीच्या स्वरयंत्रणेमध्ये किंवा वागयंत्रणेमध्ये ( मुखाच्या अवयवामध्ये बिघाड) किंवा मज्जासंस्थेतील कारणामुळे वाचा किंवा भाषेच्या एक किंवा अनेक घटकावर परिणाम होतो त्यास भाषा किंवा वाचा अक्षमता असे म्हणतात. यामध्ये पक्षघात, घशाचा कर्करोग इत्यादीमुळे कायमस्वरूपी वाचा व भाषा विकार निर्माण होतात यामध्ये व्यक्तीला बोलायला, भाषा समजायला,वाचायला व लिहायला सुद्धा अडथळा जाणवतो. वाचा व भाषा दोषांमध्ये व्यक्ती अडखळत बोलते. शब्दांची तोडफोड केली जाते. बोलताना तारतम्य नसल्याने शब्द मागे

पुढे केले जातात. यामध्ये जीभ जाड असणे, काही व्यक्तींच्या जिभेला शेंडा नसणे, तोतरे बोलणे टाळूला छिद्र असणे अशी लक्षणे या व्यक्तीमध्ये असतात अशा लक्षणांमधील व्यक्तींना वाचा आणि भाषा अक्षमता अशी व्यक्ती म्हणतात.

**२) बौद्धिक दिव्यांग किंवा बौद्धिक अक्षमता**

**११) बौद्धिक अक्षमता**

बौद्धिक अक्षमता म्हणजे ज्या व्यक्तीच्या शरीराची वाढ झालेली आहे पण मेंदूची वाढ खुंटलेली आहे अशा व्यक्तीला बौद्धिक अक्षमता असे म्हणतात. यामध्ये सर्व साधारण माणसाच्या बुद्धीपेक्षा अशा व्यक्तींच्या बुद्धीची IQ लेवल फारच कमी असते. म्हणजे अशा व्यक्तीला तर्क लावणे, लिहिल्या वाचण्यामध्ये समस्या, समस्येचे निराकरण करता येत नाही, दैनंदिन जीवनातील रोजचे वर्तन व कामे करण्यासाठी कठीणपणा येतो बौद्धिक क्षमताही (IQ) ७० पेक्षा कमी असतो. अशा व्यक्तीला तार्किक प्रश्न सोडविताना अडचणी येतात अशा व्यक्तीला नवीन वातावरणात तडजोड करता येत नाही. काही मुलांमध्ये वर्तन समस्या जाणवते अशा व्यक्तीमध्ये हळुवार बौद्धिक विकास होतो.

**१२) अध्ययन अक्षमता**

विशिष्ट अध्ययन अक्षमता म्हणजे ज्या व्यक्तीला लिखाण, बोलणे किंवा भाषा समजावून घेण्यात किंवा ऐकणे, वाचणे, शब्द लेखन करणे, गणितीय प्रक्रियेत दोष असतात ही मज्जासंस्थेची निगडीत स्थिती असून मेंदूला माहिती पाठविण्यास, प्राप्त करण्यामध्ये आणि प्रक्रिया करण्याच्या क्षमतेवर परिणाम करते अशाला अध्ययन अक्षमता म्हणतात. अध्ययन अक्षम असणारी मुले समजावून घेण्यासाठी dysgraphia, dyslexia, dyscalculia, dyspraxia याची माहिती घेणे फार गरजेचे आहे. अशी मुले अभ्यासात मागे राहतात यांचा बुद्ध्यांक सामान्य किंवा जास्त असू शकतो या मुलांमध्ये वर्तन समस्या किंवा संभाषण समस्या ह्या जास्त प्रमाणात असतात या व्यक्तींना आकलन करण्यास अवघड जाते, अंक ओळखण्यांमध्ये गोंधळ होतो, उलटे अक्षर लिहिणे, शब्द एक कमी करून म्हणजे गाळून लिहिणे किंवा वाचणे अशा वर्तनाच्या समस्या यांच्यामध्ये जाणवतात.

**१३) स्वमग्नता**

लहान मुलांच्या विविध आजारात ऑटिझमचे प्रमाण वाढलेले दिसते. ऑटिझम म्हणजे स्वमग्नता Autism Spectrum Disorder(ASD) या नावाने याला ओळखतात. व्यक्तीच्या आयुष्यात पहिल्या तीन वर्षांमध्येच दिसणारी गुंतागुंतीची मज्जासंस्थेच्या किंवा मनोबौद्धिक विकासामध्ये अडथळा आणणारी समस्या आहे. अशा व्यक्ती स्वतःच्याच विश्वामध्ये हरवलेल्या असतात. अशा लोकांची भाषिक कौशल्य कमी विकसित झालेली असतात. अशांना बदल आवडत नाही. त्या बदलाचा लगेच राग येतो, व्यक्तींच्या पेक्षा खेळणी वस्तू यांचा ओढा या मुलांमध्ये अधिक असतो. या व्यक्तीमध्ये सामाजिक आंतरक्रिया,संप्रेषण, कल्पनाशक्तीचा अभाव आढळतो. खूप कमी संभाषण करणे, अवधान केंद्रित करता न येणे, विशिष्ट प्रकारचे आवाज काढणे, आक्रमकपणा व स्वतःच्याच कल्पना विश्वामध्ये रममाण असणारी अशी ओळख त्यांची असते.

**३) मानसिक दिव्यांगत्व**

**१४) मानसिक आजार**

ज्यावेळी व्यक्तीचे विचार, अभिमुखता, आकलन आणि स्मरणशक्ती यांचा एक मोठा रोग किंवा आजार म्हणजे मानसिक आजार होय. या आजारामुळे व्यक्तीला आपले निर्णय घेताना अडचणी येतात अशा व्यक्तीचे वर्तन अस्वाभाविक किंवा असामान्य वर्तन असते. अशा व्यक्तीला वास्तविकता ओळखता येत नाही. आयुष्याच्या सामान्य मागण्या पूर्ण करता येत नाहीत. अशा व्यक्ती खूप कमी बोलतात किंवा खूप अधिक बोलतात. भ्रम आभास व भयानक स्वप्न पडणे, कोणत्याही वस्तूला घाबरणे किंवा न घाबरणे, मानसिक आजार ही आटळ किंवा अपूर्ण स्थिती आहे यामध्ये व्यक्तीच्या मेंदूचा विकास विशेषता बुद्धिमत्तेच्या असामान्यतेपणामुळे निदर्शला जातो. अकारण बडबडणे, स्वतःशीच बोलणे, अशी लक्षणे या व्यक्तीमध्ये दिसतात.

**४) पेशी व रक्तासंबंधी Chronic neurological and Blood disorder**

**१५) मल्टीपल स्क्लेरोसीस**

मल्टिपल स्क्लेरोसीस (MS) हा मेंदू किंवा पाठीचा कणा निकामी करणारा आजार आहे. ज्यामध्ये आपल्या शरीरातील रोगप्रतिकारक प्रणाली मज्जा तंतू वरील संरक्षक मायलिन आवरणावर आघात करतात यामुळे मज्जा संस्थेची हानी होते यामुळे मज्जासंस्थेतील तंतूंची आणि मस्तीष्क मधील पेशींची एकमेकांशी संवाद साधण्याची क्षमता कमी होते. या व्यक्तीमध्ये मांसपेशी मध्ये कमजोरी तसेच स्नायू मध्ये शिथिलता येऊन स्नायू काम करणे कमी करतात व

याचबरोबर मलद्वार व मूत्राशयातील नियंत्रण राहत नाही हा रोग किंवा विकार मेंदूमधील चेतासंस्थेमधील (सेंट्रल नर्व्हस सिस्टीम) संदेश वाहन करण्याऱ्या चेतातंतूवरील संरक्षण आवरण मायलिनला धक्का बसल्यामुळे होतो. मल्टिपल स्क्लेरोसीसची लक्षणे ही नसांवर घडलेल्या परिणामानुसार वेगवेगळी असू शकतात. यामध्ये कोणत्या नसांना किती प्रमाणात इजा झाली आहे यावर रुग्णांमधील लक्षणे आणि त्याची तीव्रता अवलंबून असते.

**१६) कंपवात रोग**

कंपवात म्हणजे मेंदूचा जो भाग (सबस्टांन्शिया नायग्रा) म्हणजे शरीराच्या हालचालीवर नियंत्रण करणारा त्या भागातील चेतापेशींचा हळूहळू नाश जिच्यात होतो ती विकृती म्हणजे कंपवात होय. व्यक्तीचे स्नायू ताठर होणे, हातापायांना कंप सुटणे, हालचालीमध्ये शिथिलता येणे, व्यक्तीला शरीराचा तोल सांभाळता न येणे, कंपवात रुग्णांचे वजन कमी होणे, १८१७ साली ब्रिटिश वैद्यकीय तज्ञ जेम्स पार्किन्सन यांनी ही प्रथमता स्थिती लोकांच्या नजरेसमोर आणली म्हणून या विकृतीला पार्किन्सन रोग असेही म्हणतात. कंपवात झालेली व्यक्ती स्थिर बसलेले असतानाही त्या व्यक्ती उभ्या राहिल्यास तिचे शरीर थोडे पुढे कललेले दिसते. वयाच्या ५० ते ६० च्या दरम्यान या रोगाचे प्रमाण जास्त असते रेणूंच्या अभावामुळे रोग्याला कंप सुटतो.

**१७) अधिक रक्तस्त्राव**

अधिक रक्तस्त्राव ही दुर्मिळ अनुवंशिक स्थिती आहे जी व्यक्तीचे रक्त गोठण्यास प्रतिबंध करते या किरकोळ जखमामुळे आणि काही काही वेळा अंतर्गत जखम न होता ही अधिक रक्तस्त्राव होतो याला ब्लीडर रोग किंवा हिमोफेलिया असे देखील म्हणतात. यामध्ये हा रोग पुरुषावर परिणाम करतो परंतु स्त्रिया त्यांच्या नर मुलाकडे हा रोग प्रसारित करतात. बहु रक्तस्त्राव रक्ताच्या गोठण्यास प्रतिबंध करतो दुखापत झाल्यास या रुग्णांना अधिक रक्तस्त्राव होऊ शकतो ज्यामुळे रक्ताचे जास्त प्रमाणात वाहण्याने औषधोपचार वेळेत केले नाही तर व्यक्तीला मृत्यू देखील येऊ शकतो. रक्तस्त्राव थांबत नसल्याने शरीराचा भाग फुगतो, शरीरावर निळ्या रंगाचे डाग येणे शरीरातील प्रोटीन कमी होणे अशी लक्षणे या रोगात दिसतात.

**१८) थलेसिमिया कॅन्सर**

हिमोग्लोबिनच्या कमतरतेमुळे हा अनुवंशिक विकार आहे. जो लाल रक्तपेशीवर प्रभाव पाडतो आणि पालकाकडून संक्रमण केले जाते हा असा विकार आहे ज्यामुळे शरीरामध्ये असामान्य हिमोग्लोबिन तयार होते आणि यामुळे लाल रक्तपेशींचे खूप नुकसान होते आणि शेवटी अनिमिया होतो शरीरात रक्ताची कमतरता, गडद् रंगाची लघवी, थकवा निस्तेज त्वचा, संत गतीने वाढ तसेच अशा व्यक्ती वारंवार यांना रक्त पुरवावे लागते,चेहरा सुखावणे वजन वाढत नाही, श्वास घेण्यामध्ये त्रास अशा व्यक्ती नेहमी आजारी पडतात.

**१९) सिकल सेल**

सिकल सेल म्हणजे विळ्यासारखा आकार असलेल्या तांबड्या पेशी ज्यात 'हिमोग्लोबिन एस' असते. हा रोग म्हणजे हिमोलेटिक डिसऑर्डर ज्या व्यक्तीला तीव्र अशक्तपणा, वेदनादायक घटना आणि संबंधित उतींचे आणि अवयवांचे नुकसान झाल्यामुळे व्यक्तीच्या शरीरात गुंतागुंत वाढते. मानवात दिसणाऱ्या ६०० प्रकारच्या असामान्य हिमोग्लोबीन पैकी 'हिमोग्लोबिन एस' एक आहे हेमोलायटिक म्हणजे लाल रक्तपेशींच्या नाश झाल्याच्या परिणामामुळे रक्तस्त्राव होतो. या व्याधीमध्ये रक्ताचे प्रमाण कमी होते. रक्ताच्या कमतरतेमुळे शरीराचे अवयव जास्त अशक्त होतात व यामुळे व्यक्तीला थकवा जाणवतो वारंवार रक्त द्यावे लागते त्यामुळे शरीरावर व अवयवावर परिणाम होतो.

**२०) मज्जासंस्थेचे तीव्र आजार**

मेंदूमध्ये Central peripheral nervous system तसेच Brain spinal cord neuromuscular system यामध्ये विकृती झाल्याने हा आजार होतो. हा मेंदूवर परिणाम करणारा आजार आहे. तसेच मानवी शरीरावर आणि पाठीचा कणा, मेंदू किंवा इतर नसांमधील स्ट्रक्चरल, बायोकेमिकल किंवा विद्युतीय विकृतीमुळे विविध प्रकारची लक्षणे यामध्ये उद्भवतात. व्यक्तीच्या चेतासंस्थेच्या क्षतीमुळे हा आजार निर्माण होतो. Epilepsy, Alzheimer's, Migraine, Headache, Disorder brain tumors इत्यादी प्रकारचे आजार यात दिसून येतात. वारंवार फिट्स, अपस्माराचे झटके येणे, शारीरिक व बौद्धिक वाढ कमी, हाता पायात ताकद कमी, स्नायूमध्ये कडकपणा येणे.

**२१) बहु विकलांग**

वरील २० दिव्यांग प्रकारांमधील एकापेक्षा जास्त दिव्यांग अपंगत्व असणाऱ्या व्यक्तीला बहु विकलांग व्यक्ती असे म्हणतात. यामध्ये दोन किंवा अधिक दिव्यांगत्व व्यक्तीला असते. अशा व्यक्तींना दैनिक क्रिया करताना अडचणी येतात हालचाल करण्यामध्ये अडचणी जाणवतात. यामध्ये Deaf blindness समाविष्ट आहे. (कर्णबधिर+ अंधत्व) असे एकत्रित अपंगत्व येते. तीव्र स्वरूपातील मुले झोपलेल्या स्थितीत असतात. बऱ्याच मुलांना चालताना, बोलताना उभे राहताना शि- शु अशा दैनंदिन क्रिया करताना समस्या जाणवतात.

**निष्कर्ष –**

दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम या २०१६ च्या कायद्याप्रमाणे जे दिव्यांगाचे प्रकार पडलेले आहेत. ते प्रकार सर्व दिव्यांगाना समावेशित करू शकतात. पण काही दिव्यांगांचे प्रकार व त्याविषयी असणाऱ्या सरकारी स्तरावरून होणारे योजनांचे सरकारी लाभ मात्र पालकांना मिळत नाहीत ही खरी चिंतेची बाब आहे.

**संदर्भ :-**

१) दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६, कोल्हापूर जिल्हा परिषद अहवाल- २०२१.

२) samaveshitshikshn. com.

३) ncbci.nlm.gov/

४) कछल दिपिका, (२०१६), ‘दिव्यांग बांधवांचा सर्वसमावेशक प्रवास’, योजना मासिक, नवी मुबई,